<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.</u>

**१०.** माझे डी. फार्म चे शिक्षण झालेले आहे. मला दावा मिळकतीचा पुर्वीचा सर्वे क्रमांक माहिती नाही. मी दावा मिळकतीचा गटाचा नकाशा पाहिला आहे. गट क्र.६० चे एकूण क्षेत्र २ हेक्टर २ आर आहे. मी त्याचा संपुर्ण नकाशा पुराव्यासोबत जोडला आहे. मी दावा मिळकतीची बिगरशेतीची परवानगी घेतलेली नाही. सदर परवानगी प्रतिवादी क्र.३ ने घेतलेली आहे. त्याने त्याबाबत तहसिल कार्यालय आणि पुणे विभाग आयुक्त यांची परवानगी घेतलेली आहे. त्याने ती परवानगी जागा बिगरशेती वापरासाठी घेतली आहे. मला त्याबाबत प्रतिवादी क्र.३ ने पुणे आयुक्तांकडे अर्ज केल्याची माहिती नाही. मला पुणे आयुक्तांच्या आदेशाची प्रत सादर करता येणार नाही.

**११**. मला बिगरशेती जमिनीचा ले–आऊट करावा लागतो याची माहिती आहे. मला दावा मिळकती बाबतचा ले–आऊट कोणी व कधी केला याबाबत माहिती नाही. मला त्याबाबत कोणी परवानगी दिली याची माहिती नाही. तहसिलदार कार्यालयाने दि.०९.०३.२०११ रोजी बिगरशेतीचा आदेश पारीत केला होता. माझ्याकडे त्याची प्रमाणित प्रत आहे, मी ती न्यायालयात हजर करु शकतो. माझ्याकडे सन २०११ नंतर दावा मिळकतीमध्ये मोजणी विभागाने ले–आऊट प्लॅनप्रमाणे मोजणी करुन केलेला नकाशा आहे. मी या प्रकरणामध्ये मोजणी खात्याने केलेल्या नकाशाची प्रत दाखल केलेली नाही.

**१२**. मी दावा मिळकतीची खरेदी केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० ते ४.०० वाजेच्या दरम्यान तिचा ताबा घेतला होता. मी ताबा घेताना दावा मिळकतीच्या शेजारच्या प्लॉटधारकांना बोलावले नव्हते. मी शेजारील प्लॉटधारकांकडून त्यांच्या हद्दीच्या खुणा निश्चित करुन घेतल्या नव्हत्या. मला मोजणी खात्याने बिगरशेती ले–आऊटच्या नकाशाप्रमाणे मोजणी केल्याची माहिती नाही. मी खरेदी केलेल्या प्लॉटची मोजणी खात्याकडून मोजणी केलेली नाही.

**१३**. मला प्रतिवादी क्र.३ ने सुधारीत बिगरशेती व ले–आऊट मंजूर करुन घेतल्याची माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ ने गट क्र.६० मधील १ हेक्टर ४२ आर क्षेत्राबाबत

बिगरशेती परवाना घेतला होता. मला गट क्र.६० मध्ये बिगरशेती केलेल्या क्षेत्राचा व इतर शेती क्षेत्राचा नकाशा असल्याबाबत माहिती नाही. मला गट क्र.६० चे बिगरशेती व शेतजमिनी बाबतचा स्वतंत्र नकाशा असल्याची माहिती नाही.

**१४**. प्रश्न – गट क्र.६० च्या पुर्व बाजूने गडहिंग्लज–आजरा महामार्ग आहे ?

उत्तर – गट क्र.६० हा एल आकाराचा असून माझ्या प्लॉट क्र.२२ च्या पुर्वेला आजरा–गडहिंग्लज रस्ता आहे.

**१५**. मला गट क्र.६० च्या संपुर्ण पुर्वेकडील बाजूला आजरा–गडहिंग्लज महामार्ग लागून असल्याचे सांगता येणार नाही. मला महामार्गाच्या मध्यापासून ३० मिटर अंतरापर्यंत कोणतेही बांधकाम करता येत नसल्याची माहिती नाही. मला सदर क्षेत्राबाबत बिगरशेती परवाना मंजूर करता येऊ शकत नसल्याची माहिती नाही. मी प्रतिवादी क्र.३ कडे मला विक्री केलेल्या जागेची सरकारी मोजणी करुन देण्याची मागणी केली नव्हती.

प्रश्न – तुम्हाला संपुर्ण बिगरशेती क्षेत्राचे स्वतंत्र ७/१२ उतारे झाल्याची माहिती आहे काय ?

उत्तर – मला माझ्या क्षेत्राचा स्वतंत्र ७/१२ उतारा मिळालेला असून इतर क्षेत्राबाबत माहिती नाही.

**१६**. माझ्या क्षेत्राच्या स्वतंत्र ७/१२ उता–याचा क्र.६०/२०२२ आहे. त्याचा स्वतंत्र नकाशा नाही. मला गट क्र.६० मधील प्लॉट हद्दीच्या खुणेपासून किती अंतराचे आहेत व त्यांची लांबी–रुंदी सांगता येणार नाही. सरकारी मोजणी शिवाय बिगरशेती प्लॉटची ले–आऊट प्रमाणे लांबी–रुंदी निश्चित होऊ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६० ची मोजणी झालेली नसल्यामुळे मी दावा मिळकतीची निश्चित लांबी–रुंदी सांगू शकत नाही.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ने गट क्र.६० मधील १ हेक्टर ४२ आर क्षेत्र बिगरशेती करण्याबाबत केलेल्या आदेशाचे पालन केलेले नाही. प्रतिवादी क्र.१ ने

प्रतिवादी क्र.२ कडून प्लॉट क्र.२१ ची खरेदी केली आहे. मला सदर मिळकत प्रतिवादी क्र.२ ने खरेदी केल्यापासून त्याच्या ताब्यात असल्याची माहिती नाही. मला सदर मिळकत प्रतिवादी क्र.२ ने केव्हा खरेदी केली होती याची माहिती नाही. मला मी माझा प्लॉट खरेदी करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ चे नाव उता-यावरती असल्याची माहिती नाही.

**१८**. मी माझे खरेदीपत्र वाचून पाहिलेले आहे. मी खरेदी करताना त्यासोबत प्लॉट क्र.२२ चा स्वतंत्र ७/१२ उतारा जोडलेला नव्हता. माझ्या खरेदीपत्रामध्ये प्लॉट क्र.२२ बाबतच्या स्वतंत्र ७/१२ उता-याचा उल्लेख नाही. मी खरेदीखत लिहिणा-याला कागदपत्रे दाखवून ते लिहून घेतलेले आहे. मी खरेदीपत्राची संपुर्ण माहिती स्वतः दिलेली आहे. मी माहिती देताना प्लॉट क्र.२२ ची मोजणी झाल्याचा स्वतंत्र नकाशा नव्हता. माझ्याकडे प्रतिवादी क्र.३ ने प्लॉट क्र.२२ च्या दिलेल्या नकाशा व्यतिरिक्त स्वतंत्र मोजणी नकाशा नाही. मी खरेदीपत्रासोबत ले-आऊटचा तयार नकाशा जोडलेला आहे.

**१९**. प्रश्न – तुम्ही खरेदीपत्रासोबत प्रमाणित नकाशा जोडलेला नाही ?
उत्तर – मी खरेदीपत्रासोबत तहसिल कार्यालयाने दिलेला बिगरशेतीचा नकाशा जोडलेला आहे.

**२०**. मी खरेदीपत्रासोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे मोजणी खात्याने केलेल्या मोजणीचा नकाशा सादर केलेला नाही. मला प्रतिवादी क्र.१ ने सर्व प्लॉटधारक व तहसिलदार तसेच जिल्हाधिकारी व मोजणी कार्यालया विरोधात गडहिंग्लज न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याची माहिती आहे. त्यामध्ये त्याने बिगरशेती आदेशाप्रमाणे मोजणी होऊन हद्दी निश्चिती करण्याची मागणी केली आहे. मी त्या कामात हजर झालेलो असून लेखी कैफियत दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काल्पनिक व चुकीच्या चतुःसिमा नमूद करुन हा दावा दाखल केला आहे.

**२१**. माझ्याकडे प्रतिवादी क्र.१ ने माझ्या प्लॉटवरती अतिक्रमण केल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. प्रतिवादी क्र.१ त्याच्या व्यवसायासाठी प्लॉट क्र.२१ मध्ये शेड बांधत आहे.

साक्षीदार स्वतःहून सांगतो, प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या हद्दीत अतिक्रमण केले आहे. मी सध्या प्रतिवादी क्र.१ ने अतिक्रमण केल्याचे तोंडी सांगत आहे. माझ्याकडे मी सांगत असलेल्या दावा मिळकतीच्या चतुःसिमेचा नकाशा नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने माझ्या मिळकतीमध्ये कोणताही अडथळा केलेला नाही. मला प्रतिवादी क्र.१ ने तात्पुरत्या शेडचे बांधकाम केल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला अडथळा करुन त्रास देण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट क्र.२२ मध्ये माझी मालकी व ताबा नाही.

**प्रतिवादी क्र.२ तर्फे उलट तपास – एकतर्फा**.

**प्रतिवादी क्र.३ तर्फे उलट तपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील**.

**२२**. मला प्रतिवादी क्र.३ ने मंजूर ले–आऊट प्रमाणे खरेदीपत्र करुन दिलेले आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १५.०४.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.